जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 MAY 2026
पुढारी

# विद्यापीठाकडून ४३९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ४३९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. सध्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी बीए, एमसीए, एमटेक, बीटेक, एमजे, एमबीए, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, बीबीए, एमबीए (इंटिग्रेटेड) ५६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने ८४ केंद्रांवर झाल्या. परीक्षेला ७ हजार १७ विद्यार्थी उपस्थित होते. सोमवारी (दि. २५) डिप्लोमा इन पोर्तुगीज, एमएस्सी (स्टॅट), एमएस्सी (फिजिक्स), एमएस्सी (कॉम्प्युटर सायन्स) आदी १४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 MAY 2026

सकाळ

# विद्यापीठात 'मिशन लाईफ कॅम्पेन'ला प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे 'मिशन लाईफ कॅम्पेन'चा आज कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते प्रारंभ झाला. 'पर्यावरण संवर्धन आणि ई-कचरा' या विषयावरील ऑनलाईन पोस्टर प्रदर्शनाचेही उद्घाटन झाले. कुलगुरू डॉ. कामत यांनी इलेक्ट्रॉनिक वस्तू, मोबाईल आदी वाढत्या सुखसोयीच्या साधनांमुळे ई-कचऱ्याचे प्रमाणही जागतिक स्तरावर वाढत आहे. या कचऱ्याच्या व्यवस्थापनाचे मोठे आव्हान आपल्यासमोर उभे आहे. त्यासाठी योग्य मार्ग काढणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने जनमानसात ई-कचरा व्यवस्थापनविषयक प्रचार व प्रसार व्हावा, त्याचे महत्त्व समजावे, यासाठी हे अभियान हाती घेतल्याचे सांगितले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. सामाजिक समावेशन केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी स्वागत केले. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. कबीर खराडे, रामचंद्र पवार, पवन गायकवाड, आनंद खामकर, आशीष घाटे उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात आजपासून जागतिक पर्यावरण अभियान

कोल्हापूर/प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठातील सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने 'जागतिक पर्यावरणदिन–पर्यावरणपूरक जीवनशैलीसाठी मिशन लाईफ (LiFE) अभियान' अंतर्गत विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हे अभियान दिनांक २५ मे ते ५ जून २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. ही माहिती केंद्राचे संचालक प्रा. डॉ. मुरलीधर भानारकर यांनी दिली आहे.

यावर्षीच्या जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना "हवामान बदल" ही असून पृथ्वीसमोरील वाढत्या पर्यावरणीय आव्हानांबाबत जनजागृती निर्माण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. अभियानांतर्गत ऊर्जा बचत, पाणी संवर्धन, प्लास्टिकमुक्त जीवनशैली, ई-कचरा व्यवस्थापन, कचरा निर्मूलन, शाश्वत अन्नप्रणाली आणि आरोग्यदायी जीवनशैली या सात प्रमुख विषयांवर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या अभियानाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते दिनांक २५ मे रोजी होणार असून याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित राहणार आहेत. या अभियानाचा भाग म्हणून विद्यापीठ परिसरात ई-कचरा संकलन मोहीम आयोजित करण्यात येणार असून मोबाईल, चार्जर, बॅटऱ्या, जुने संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, केबल्स आणि इतर इलेक्ट्रॉनिक साहित्याचे सुरक्षित संकलन करण्यात येणार आहे.

दि. २६ मे रोजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत जनजागृतीपर पोस्टर्स, डिजिटल स्क्रीनसेव्हर्स आणि सोशल मीडिया मोहिमेद्वारे पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला जाणार आहे. दि. २७ मे श रोजी 'ई-कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत विकास' या विषयावर ऑनलाइन प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले असून ग्रीस येथील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, डॉ. रानिया लंपाऊ या मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर २९ मे रोजी 'ई-कचरा व्यवस्थापन व शाश्वत विकास' विषयावर सिद्धार्थ शिंदे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच ३० मे रोजी "समाज आणि शाश्वत विकास : शिक्षकांची भूमिका"या विषयावर डॉ. सुधीर कुंभार यांचे ऑनलाईन व्याख्यान होणार आहे.

या अभियानांतर्गत विद्यापीठ परिसर व संलग्न महाविद्यालयांमध्ये ई-कचरा सर्वेक्षण आणि लेखापरीक्षण देखील राबविण्यात येणार आहे. गूगल फॉर्मच्या माध्यमातून हे सर्वेक्षण २५ मे ते १ जून या कालावधीत करण्यात येणार आहे. या अभियानाचा समारोप कार्यक्रम ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनी होणार आहे.

2 6 MAY 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# के. आर. यादव यांच्या निधनाने बहुआयामी व्यक्तिमत्त्व पडद्याआड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे प्रथम प्र-कुलगुरू डॉ. के. आर. यादव यांच्या निधनाने बहुआयामी व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले, अशा भावना अनेकांनी शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या शोकसभेत व्यक्त केल्या.

डॉ. यादव यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेतले. कडक शिस्तीचे, उत्कृष्ट अध्यापक, शिस्तप्रिय आणि विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांचा नावलौकिक असल्याच्या भावना कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी व्यक्त केल्या. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, न्यू कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून कार्यरत असताना लावलेल्या कडक शिस्तीमुळेच अनेक विद्यार्थी घडले. समाजशास्त्र अधिविभागाचे डॉ. प्रल्हाद माने, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे शरद तळेकर, शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे नंदकुमार झांजगे यांनी भावना व्यक्त केल्या.

2 6 MAY 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. के. आर. यादव एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड

## कुलगुरू डॉ. कामत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम प्र-कुलगुरू डॉ. के. आर. यादव यांच्या निधनामुळे बहुआयामी व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशा शोकभावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये प्रथम प्र-कुलगुरू डॉ. के. आर. यादव यांच्या निधनामुळे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शोक प्रस्तावाचे वाचन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले. कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, डॉ. के. आर. यादव यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेतले. कडक शिस्तीचे, उत्कृष्ट अध्यापक, शिस्तप्रिय आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून डॉ. यादव यांचा नावलौकिक होता. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचा वारसा जपत शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळावर त्यांनी सदस्य आणि अध्यक्ष म्हणून काम पाहिले. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. रा. कृ. कणबरकर यांनी लावलेली शिस्त ते पुढे घेऊन गेले.

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव शोकभावना व्यक्त करताना म्हणाल्या, विद्यापीठाचे प्रथम प्र-कुलगुरू डॉ. के. आर. यादव यांनी न्यू कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून कार्यरत असताना लावलेल्या कडक शिस्तीमुळे कॉलेजचे नाव पश्चिम महाराष्ट्रामध्ये फार आदराने घेतले जात होते. त्यांच्या शिस्तीतच आम्ही सर्व विद्यार्थी घडलो. याप्रसंगी समाजशास्त्र अधिविभागाचे डॉ. प्रल्हाद माने, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे शरद तळेकर, शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे नंदकुमार झांजगे यांनी शोकभावना व्यक्त केल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 MAY 2026

सकाळ

# के. आर. यादव यांच्या निधनाने बहुआयामी व्यक्तिमत्त्व हरपले

## कुलगुरू डॉ. आर. के. कामत : विद्यापीठातील शोकसभा

कोल्हापूर, ता. २५ : 'शिवाजी विद्यापीठाचे पहिले प्र-कुलगुरू डॉ. के. आर. यादव यांच्या निधनामुळे बहुआयामी व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले,' अशी शोकभावना कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी व्यक्त केली.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये डॉ. यादव यांना आदरांजली वाहण्यासाठी शोकसभा घेण्यात आली. 'प्रतिकूल परिस्थितीत डॉ. यादव यांनी शिक्षण घेतले. कडक शिस्तीचे, उत्कृष्ट अध्यापक, शिस्त आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांचा नावलौकिक होता. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचा वारसा जपत शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. माजी कुलगुरू डॉ. रा. कृ. कणबरकर यांनी लावलेली शिस्त ते पुढे घेऊन गेले,' असे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, 'न्यू-कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून कार्यरत असताना डॉ. यादव यांनी लावलेल्या कडक शिस्तीमुळे कॉलेजचे नाव पश्चिम महाराष्ट्रात आदराने घेतले जात होते. त्यांच्या शिस्तीतच आम्ही सर्व विद्यार्थी घडलो.' समाजशास्त्र अधिविभागाचे डॉ. प्रल्हाद माने, विद्यापीठ सेवक संघाचे शरद तळेकर, कर्मचारी संघाचे नंदकुमार झांजगे यांनीही शोकभावना व्यक्त केली.

2 6 MAY 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रकुलगुरूपदी डॉ. ज्योती जाधव यांची नियुक्ती

## पहिल्या महिला प्रकुलगुरू; प्रभारी अधिष्ठात्यांच्याही नियुक्त्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या प्रकुलगुरूपदी डॉ. ज्योती प्रफुल्ल जाधव यांची सोमवारी नियुक्ती झाली. त्या विद्यापीठाच्या पहिल्या महिला प्रकुलगुरू ठरल्या आहेत. कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी कुलगुरू कार्यालयात नियुक्तीचे पत्र प्रदान केले. गेले काही दिवस डॉ. जाधव यांनी प्रभारी प्रकुलगुरू म्हणून काम पाहिले होते.

या वेळी कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, डॉ. जाधव यांचे शैक्षणिक, संशोधकीय योगदान उच्च दर्जाचे आहे. त्यांच्या या अनुभवाचा लाभ विद्यापीठाला निश्चितपणे होईल.

नियुक्तीनंतर प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, शिक्षण, संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाधारित उपक्रमांवर भर दिला जाईल. विद्यार्थ्यांना 'लर्नर टू अर्नर' बनविणारे शिक्षण देणे, विद्यापीठातील संशोधनाला जागतिक ओळख प्राप्त करून देणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे अभिनव उपक्रम या त्रिसूत्रीवर काम केले जाईल.



कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठाच्या नूतन प्रकुलगुरूपदी डॉ. ज्योती जाधव यांची नियुक्ती झाली. नियुक्तिपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी त्यांचे स्वागत केले.

## प्रभारी अधिष्ठांताची नियुक्ती

कुलगुरूंनी सोमवारी सर्व विद्याशाखांच्या प्रभारी अधिष्ठाता यांची नियुक्ती केली. त्यात डॉ. राजाराम गुरव (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा), डॉ. महादेव देशमुख (मानव्यविज्ञान विद्याशाखा), डॉ. वर्षा मैंदर्गी (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) आणि डॉ. अजय साळी (आंतरविद्याशाखा) यांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 MAY 2026
तरुण भारत

# विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदी डॉ. ज्योती जाधव यांची नियुक्ती

- शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या महिला प्र- कुलगुरू
- कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांची माहिती

**प्रतिनिधी**, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डॉ. ज्योती जाधव यांची नियुक्ती करण्यात येत असल्याचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी सोमवारी जाहीर केले. डॉ. जाधव या शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या महिला प्रभारी प्र-कुलगुरू होत्या. त्या आता शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या महिला प्र-कुलगुरू ठरल्या आहेत.

विद्यापीठात कुलगुरू डॉ. कामत यांनी डॉ. जाधव यांना दुपारी कुलगुरू कार्यालयात नियुक्तीचे पत्र प्रदान केले. या संदर्भात कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, डॉ. ज्योती जाधव यांचे शैक्षणिक आणि संशोधकीय योगदान उच्च दर्जाचे आहे. त्यांच्या या अनुभवाचा लाभ शिवाजी विद्यापीठाला निश्चितपणे होईल, याची खात्री वाटते. त्यांच्या रुपाने एक करवीरकन्या शिवाजी विद्यापीठाची पहिली महिला प्र-कुलगुरू होत असल्याचे त्यांनी सांगितले.

कुलगुरूंनी आज सर्व विद्याशाखांच्या प्रभारी अधिष्ठात्यांची नियुक्ती केली आहे. यामध्ये डॉ. राजाराम गुरव (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा), डॉ. महादेव देशमुख (मानव्यविज्ञान विद्याशाखा), डॉ. वर्षा मैंदर्गी (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) आणि डॉ. अजय साळी



**कोल्हापूर : डॉ. ज्योती जाधव यांच्या नियुक्तीप्रसंगी कुलगुरू डॉ. रजनीश कामत.**

(आंतरविद्याशाखा) यांची नियुक्ती केली आहे.

डॉ. ज्योती जाधव यांनी मंत्री चंद्रकांत पाटील आणि कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांना 'लर्नर टू अर्नर' बनविणारे शिक्षण देणे, विद्यापीठातील संशोधनाला जागतिक ओळख प्राप्त करून देणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे अभिनव उपक्रम राबविणे या त्रिसूत्रीवर काम करीत विद्यापीठाला नव्या उंचीवर नेण्याचा मानस डॉ. जाधव यांनी व्यक्त केला.

2 6 MAY 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डॉ. ज्योती जाधव



## पहिल्या महिला प्र - कुलगुरु : प्रभारी अधिष्ठात्यांच्याही नियुक्त्या पूर्ण

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डॉ. ज्योती जाधव यांची नियुक्ती करण्यात येत असल्याचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी सोमवारी जाहीर केले. त्या पहिल्या महिला प्रभारी प्र-कुलगुरू होत्या. अन् आता पहिल्या महिला प्र-कुलगुरू ठरल्या आहेत.

कुलगुरू डॉ. कामत यांनी डॉ. जाधव यांना सोमवारी दुपारी नियुक्तीचे पत्र देत पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. या संदर्भात कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, डॉ. ज्योती जाधव यांचे शैक्षणिक आणि संशोधकीय योगदान उच्च दर्जाचे आहे. त्यांच्या या अनुभवाचा लाभ शिवाजी विद्यापीठाला निश्चितपणे होईल. त्यांच्या रुपाने करवीरकन्या विद्यापीठाची पहिली महिला प्र-कुलगुरू होत आहे.

त्याचप्रमाणे कुलगुरूंनी सर्व विद्याशाखांच्या प्रभारी अधिष्ठाता यांची नियुक्ती केली आहे. यामध्ये डॉ. राजाराम गुरव (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा), डॉ. महादेव देशमुख (मानव्यविज्ञान विद्याशाखा), डॉ. वर्षा मैंदर्गी (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) आणि डॉ. अजय साळी (आंतरविद्याशाखा) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**संशोधन, आधुनिक तंत्रज्ञानाधारित उपक्रमांवर भर : डॉ. जाधव**

प्र-कुलगुरू म्हणून नियुक्ती केल्याबद्दल डॉ. ज्योती जाधव यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांना 'लर्नर टू अर्नर' बनविणारे शिक्षण देणे, येथील संशोधनाला जागतिक ओळख प्राप्त करून देणे आणि सामाजिक बांधिलकी जपत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे अभिनव उपक्रम राबविणे या त्रिसूत्रीवर काम करीत विद्यापीठाला नव्या उंचीवर नेण्याचा मानस व्यक्त केला.

पुढारी

26 MAY 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ प्र-कुलगुरूपदी डॉ. ज्योती जाधव यांची नियुक्ती

## पहिल्या महिला प्र-कुलगुरू; प्रभारी अधिष्ठात्यांच्याही नियुक्त्या

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डॉ. ज्योती जाधव यांची नियुक्ती करण्यात आल्याचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी जाहीर केले. डॉ. जाधव पहिल्या महिला प्र-कुलगुरू ठरल्या आहेत.

कुलगुरू डॉ. कामत यांनी सोमवारी दुपारी कुलगुरू कार्यालयात नियुक्तीचे पत्र त्यांना प्रदान केले. तसेच, पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, डॉ. जाधव यांचे शैक्षणिक व संशोधकीय योगदान उच्च दर्जाचे आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा विद्यापीठाला निश्चितपणे होईल. त्याचप्रमाणे कुलगुरूंनी सर्व विद्याशाखांच्या प्रभारी अधिष्ठाता यांची नियुक्ती केली आहे. यामध्ये डॉ. राजाराम गुरव (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा), डॉ. महादेव देशमुख (मानव्यविज्ञान विद्याशाखा), डॉ. वर्षा मैंदर्गी (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) व डॉ. अजय साळी (आंतरविद्याशाखा) यांची नियुक्ती करण्यात आली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या नूतन प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचे नियुक्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत.**

**(छाया : मिलन मकानदार)**

“

विद्यार्थ्यांना 'लर्नर टू अर्नर' बनविणारे शिक्षण देणे, विद्यापीठातील संशोधनाला जागतिक ओळख प्राप्त करून देणे उद्देश आहे. सामाजिक बांधिलकी जपत कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे अभिनव उपक्रम राबविणे या त्रिसूत्रीवर काम करीत विद्यापीठाला नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न राहील.

**- प्रा. डॉ. ज्योती जाधव,**
नूतन प्र-कुलगुरू

26 MAY 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदी डॉ. ज्योती जाधव

## ठरल्या पहिल्या महिला प्र-कुलगुरू

## प्रभारी अधिष्ठातांच्याही नियुक्त्या

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदी डॉ. ज्योती जाधव यांची नियुक्ती करण्यात येत असल्याचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी सोमवारी जाहीर केले. डॉ. जाधव या शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या महिला प्रभारी प्र-कुलगुरू होत्या. त्या शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या महिला प्र-कुलगुरू ठरल्या आहेत.



कुलगुरू डॉ. कामत यांनी डॉ. जाधव यांना दुपारी कुलगुरू कार्यालयात नियुक्ती पत्र प्रदान केले, तसेच पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, डॉ. ज्योती जाधव यांचे शैक्षणिक आणि संशोधकीय योगदान उच्च दर्जाचे आहे. त्यांच्या या अनुभवाचा लाभ शिवाजी विद्यापीठाला निश्चितपणे होईल, याची खात्री वाटते. त्यांच्या रूपाने एक करवीरकन्या शिवाजी विद्यापीठाची पहिली महिला प्र-कुलगुरू होत आहे, याचा आनंद वाटतो. त्याचप्रमाणे कुलगुरूंनी आज सर्व विद्याशाखांच्या प्रभारी अधिष्ठाता यांची नियुक्ती केली आहे. यामध्ये डॉ. राजाराम गुरव (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा), डॉ. महादेव देशमुख (मानव्य विज्ञान विद्याशाखा), डॉ. वर्षा मैंदर्गी (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) आणि डॉ. अजय साळी (आंतरविद्याशाखा) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### शिक्षण, संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाधारित उपक्रमांवर भर

शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या महिला प्र-कुलगुरू म्हणून नियुक्ती केल्याबद्दल डॉ. ज्योती जाधव यांनी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांना 'लर्नर टू अर्नर' बनवणारे शिक्षण देणे, विद्यापीठातील संशोधनाला जागतिक ओळख प्राप्त करून देणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे अभिनव उपक्रम राबवणे या त्रिसूत्रीवर काम करत विद्यापीठाला नव्या उंचीवर नेण्याचा मानस यावेळी व्यक्त केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 MAY 2026
तरुण भारत

# कुलगुरू डॉ. कामत यांच्याकडून महामानवांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर शहरातील महामानवांच्या पुतळ्यांना अभिवादन करून आपल्या कारकीर्दीचा प्रारंभ केला. डॉ. कामत यांनी कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर सायंकाळी त्यांनी शहरातील महामानवांच्या पुतळ्यांना अभिवादन केले. ऐतिहासिक बिंदू चौक येथील हुतात्मा स्मारक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांचे पुतळे येथे पुष्प वाहून अभिवादन केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपतींचा पुतळा, दसरा चौक येथील छत्रपती शाहू महाराज यांचा पुतळा यांनाही अभिवादन केले. त्यानंतर राजर्षी शाहू महाराज समाधीस्थळाला भेट देऊन तेथे महाराजांच्या समाधीस्थळासमोर नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. अखेरीस कावळा नाका येथील करवीर राज्य संस्थापिका महाराणी ताराबाई यांच्या पुतळ्यालाही त्यांनी पुष्प वाहून अभिवादन केले व आपल्या कारकीर्दीचा सुरुवात केली.

2 6 MAY 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदी डॉ. ज्योती जाधव

## पहिल्याच महिला : डॉ. गुरव, साळी यांच्यासह चारजण प्रभारी अधिष्ठाता

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डॉ. ज्योती जाधव यांची नियुक्ती करण्यात येत असल्याचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी आज जाहीर केले. त्या आज विद्यापीठाच्या पहिल्या महिला प्र-कुलगुरू ठरल्या आहेत.

कुलगुरू डॉ. कामत यांनी डॉ. जाधव यांना आज कुलगुरू कार्यालयात नियुक्तीचे पत्र प्रदान केले. डॉ. जाधव यांचे शैक्षणिक, संशोधकीय योगदान उच्च दर्जाचे आहे. त्यांच्या या अनुभवाचा लाभ विद्यापीठाला निश्चितपणे होईल, याची खात्री वाटते. त्यांच्या रुपाने एक करवीरकन्या पहिली महिला प्र-कुलगुरू होत आहे, याचा आनंद वाटतो, अशी प्रतिक्रिया कुलगुरू डॉ. कामत यांनी व्यक्त केली. डॉ. जाधव या मूळच्या स्वयंभूवाडी (ता. करवीर) येथील असून, त्या भारतीय जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या शास्त्रज्ञा आहेत. त्यांचा पाचवेळा जागतिक टॉप टू परसेंट वैज्ञानिकामध्ये समावेश आहे. कुलगुरूंनी विद्याशाखांच्या प्रभारी अधिष्ठाता यांची नियुक्ती केली. त्यात डॉ. राजाराम गुरव (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा), डॉ. महादेव देशमुख (मानव्यविज्ञान विद्याशाखा), डॉ. वर्षा मैंदर्गी (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा), डॉ. अजय साळी (आंतरविद्याशाखा) यांचा समावेश आहे.

> विद्यापीठाच्या पहिल्या महिला प्र-कुलगुरू म्हणून नियुक्ती केल्याबद्दल उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांचे आभार मानते. विद्यार्थ्यांना 'लर्नर टू अर्नर' बनविणारे शिक्षण, विद्यापीठातील संशोधनाला जागतिक ओळख प्राप्त करून देण्यासह सामाजिक बांधिलकी जपत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे अभिनव उपक्रम राबविणे या त्रिसूत्रीवर काम करणार आहे.
> **- डॉ. ज्योती जाधव**, प्र-कुलगुरू

### पाच जणांना पुन्हा संधी का?

सात महिन्यांपासून डॉ. जाधव या प्रभारी प्र-कुलगुरूपदी, तर डॉ. गुरव, देशमुख, मैंदर्गी आणि साळी हे अधिष्ठातापदी कार्यरत होते. प्रभारी असतानाही त्यांनी प्रशासकीय कामकाज चांगल्या पद्धतीने सांभाळले. डॉ. जाधव यांची संशोधनाच्या पातळीवर चांगली कामगिरी आहे. त्या कोल्हापुरातील स्थानिक आहेत. त्यामुळे त्यांना पूर्णवेळ प्र-कुलगुरूपदी संधी मिळाली आहे. पूर्णवेळ अधिष्ठाता नियुक्तीची प्रक्रिया लवकरच सुरू केली जाणार आहे. आता पुन्हा नवीन व्यक्तींना संधी दिल्यास त्यांना प्रक्रिया समजण्यास विलंब लागू शकतो. त्याचा विद्यापीठ कामकाजावर परिणाम होऊ नये म्हणून प्रभारी अधिष्ठातापदी संबंधित चार जणांना पुन्हा संधी दिली आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या नूतन प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचे नियुक्तीपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत.

2 6 MAY 2026

कुमारक्रांती

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. राजनीश कामत



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी प्रा. डॉ. राजनीश कमलाकर कामत यांची निवड आज जाहीर करण्यात आली. महाराष्ट्राचे राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी आज ही घोषणा केली. आदेशाची प्रत आज सायंकाळी विद्यापीठ कार्यालयास प्राप्त झाली.

डॉ. राजनीश कामत हे शिवाजी विद्यापीठाचे १४ वे कुलगुरु ठरले आहेत. डॉ. दिगंबर शिर्के यांच्यानंतर सलग दुसऱ्यांदा शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकाकडेच कुलगुरू पदाचा पदभार आलेला आहे. डॉ. कामत हे शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे माजी प्रमुख असून विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणूनही त्यांनी काम पाहिलेले आहे. सध्या ते मुंबई येथील डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाचे कुलगुरू आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचाही अतिरिक्त कार्यभार आहे

**डॉ. कमलाकर कामत यांचा अल्पपरिचय**

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे नवे कुलगुरू डॉ. राजनीश कमलाकर कामत यांचे मूळ गाव कागल (जि. कोल्हापूर) असून त्यांचा जन्म मिरज (जि. सांगली) येथे झाला. त्यांचे कुटुंब करवीर संस्थान आणि कोल्हापूरच्या सामाजिक-शैक्षणिक परंपरेशी निगडित आहे. त्यांचे आजोबा छत्रपती राजाराम महाराजांचे खासगी वैद्य होते. त्यांचे काका डॉ. बाळकृष्ण कामत हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्नेही होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कागल येथे त्यांच्या घरी मुक्काम केला होता. त्यांचे वडील कोल्हापूर गुन्हे अन्वेषण विभागात उपअधीक्षक पदावर कार्यरत होते.

डॉ. कामत यांनी शिवाजी विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स विज्ञान शाखेत पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. दोन्ही पदव्यांमध्ये त्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. पुढे त्यांनी गोवा विद्यापीठातून पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यानंतर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळुरू आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कानपूर येथे उच्च तांत्रिक प्रशिक्षण घेतले. गोवा, कोल्हापूर आणि सोलापूर येथील विद्यापीठांमध्ये सुमारे अठ्ठावीस वर्षांचा अध्यापनाचा अनुभव त्यांच्याकडे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित कार्यकारी बुद्धिमत्ता, क्वांटम संगणन, स्नायुरूपी संगणन, यंत्रशिक्षण, विद्युत परिपथ रचना आणि सायबर-भौतिक प्रणाली या विषयांमध्ये त्यांनी संशोधन कार्य केले आहे. त्यांनी तेवीसहून अधिक अभ्यासक्रम विकसित केले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ येथे त्यांनी भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, पुणे यांच्या सहकार्याने क्वांटम संगणन उत्कृष्टता केंद्र उभारण्याचे काम सुरू केले आहे. त्यांचे अनेक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले असून त्यांची १३ आंतरराष्ट्रीय पुस्तके प्रकाशित आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 MAY 2026

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाला जागतिक स्तरावर नेण्याची जबाबदारी - डॉ. राजनीश कामत

**कोल्हापूर :** ज्या शिवाजी विद्यापीठाने मला घडवले, त्या मातृसंस्थेचे ऋण फेडणे ही आता माझी सर्वात मोठी जबाबदारी आहे. विद्यापीठाला राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर अधिक सक्षम, तंत्रज्ञानाभिमुख आणि विद्यार्थिकेंद्रित बनवण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने काम करू, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केला.



डॉ. राजनीश कामत यांचा सत्कार करताना डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव.

शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. कामत यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. माजी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. कामत यांचा स्वागतपर सत्कार करण्यात आला. डॉ. कामत म्हणाले, आजच्या काळात विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे अभ्यासक्रम, रोजगारक्षम शिक्षण आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन अत्यावश्यक आहे. बी.एस्सी. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी, डेटा सायन्स, आयओटी, स्पोर्ट्स मॅनेजमेंट यांसारखे अभ्यासक्रम काळाची गरज आहेत. विद्यापीठाने बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत पावले उचलली पाहिजेत.

सध्याच्या जागतिक युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या बचतीच्या आवाहनाचा उल्लेख करत डॉ. कामत यांनी स्वागतासाठी अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय मनोगतात वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के नवनियुक्त कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांचे अभिनंदन करताना म्हणाले, विद्यापीठाच्या प्रगतीसाठी आपल्यापेक्षा अधिक सक्षम आणि व्यापक अनुभव असलेले नेतृत्व मिळणे आवश्यक असते. तसे नेतृत्व शिवाजी विद्यापीठाला डॉ. कामत यांच्या रूपाने मिळाल्याचा आनंद वाटतो. डॉ. जी. बी. कोळेकर, माजी आमदार भगवानराव साळुंखे, डॉ. सागर डेळेकर, प्रा. शंकरराव कुलकर्णी, डॉ. डी.आर. मोरे, डॉ. निखिल गायकवाड, तेजस्विनी गोरनाळे, धैर्यशील यादव, माजी कुलगुरू प्रा. एस.एच. पवार, नाथाजी शिंदे यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सूत्रसंचालन नंदिनी पाटील, धैर्यशील यादव, आभार डॉ. अजितसिंह जाधव यांनी मानले.